One Nation, one Vision, one Identity

निडर निर्भिड

# दैनिक जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

REPUBLIC INDIA DAY 26 January

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २८३ वा सोमवार दि २६ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांगांना संरक्षण? खऱ्या अपंगांवर अन्याय!...

## बुलढाणा जिल्ह्यात तपासणीचा ढोंगी खेळ उघड....

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात शिक्षक व कर्मचारी यांच्या कार्ड तपासणीचा दिखाऊ फार्स सध्या सुरू असून, या प्रक्रियेमुळे खऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. आतापर्यंत केवळ चार तालुक्यांमध्येच तपासणी पूर्ण झाली असून, पुढील आठवड्यापर्यंत संपूर्ण जिल्ह्यात तपासणी पूर्ण करण्याचे आदेश आहेत. ज्यांच्याकडे कार्ड नाही, त्यांना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे.मात्र,खरी लढाई आता सुरू होणार आहे ती प्रत्यक्ष अपंगत्व तपासणीची खऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची स्पष्ट आणि ठाम मागणी आहे की ही प्रत्यक्ष तपासणी जे.जे. रुग्णालय, मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पॅनलकडूनच व्हावी. कारण जिल्हा व तालुका पातळीवरील तपासणीत बोगस दिव्यांगांना वाचवले जाते, हा आरोप उघडपणे होत आहे. नाशिक, बीड आणि इतर जिल्ह्यांमध्ये ज्या पद्धतीने मुंबई येथे प्रत्यक्ष तपासणी घेऊन बोगस दिव्यांग उघडे पाडले गेले, तशीच कारवाई बुलढाण्यात का नाही? हा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे, फक्त बुलढाणा तालुक्यात शिक्षक व कर्मचाऱ्यांना ओरिजिनल कार्डसह प्रत्यक्ष हजर राहण्यास सांगण्यात आले, तर उर्वरित तालुक्यांमध्ये केवळ झेरॉक्स कागदांवरच समाधान मानण्यात आले. हा दुजाभाव नाही तर काय? यामागे जिल्हा परिषद विभागातून बोगस दिव्यांगांना गोप्य पाठींबा दिला जात असल्याची जोरदार चर्चा आहे. प्रत्यक्ष तपासणी मुंबईत झाली तर जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांचा धक्कादायक आकडा समोर येईल, हे नक्की! या संपूर्ण प्रकरणालाद दैनिक जनसंचलने वाचा फोडली असून, त्यामुळेच प्रशासन हलले आहे. जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना दिव्यांग कल्याण विभागाचे कर्तव्यदक्ष सचिव तुकाराम मुंडे यांच्याकडून ठोस, निर्भीड आणि न्याय्य कारवाईची अपेक्षा आहे. आज एकच प्रश्न आहे बोगसांना संरक्षण की खऱ्यांना न्याय? दैनिक जनसंचलन खऱ्या दिव्यांगांच्या न्यायासाठी पाठीशी ठामपणे उभे आहे







**जिल्हा सामान्य रुग्णालयातून अर्थ पूर्ण दिव्यांग/ अस्तिव्यंग बोगस प्रमाणपत्र देणाऱ्याची व घेणार्याची सखोल चौकशी करून त्यांची मालमत्ता चल अचल संपत्ती व एकाच विभागात एकाच टेबलवर किती वर्षांपासून कार्यरत असून त्याची त्वरीत त्या ठिकाणाहून बदली करून दोषींवर फोजदारी गुन्हे दाखल करा या प्रकरणाचा आम्ही सतत पाठपुरावा करीत असून त्या वादग्रस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा भांडाफोड करून सत्यता प्रशासन समोर आणणार**

अजून बरेच काही पुढील भागात..

# बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणात एसीबी चौकशी सुरू होणार?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील साहित्य खरेदी व विक्रीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारींवर आता प्रशासकीय आणि कायदेशीर हालचालींना वेग आला आहे. देऊळगाव राजा येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी या प्रकरणी अनेकदा तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने (जीएडी) सार्वजनिक आरोग्य विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) या प्रकरणात सक्रिय झाला असून जिल्हा शल्य चिकित्सक आणि २१ अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १७-अ अंतर्गत चौकशी करण्याची परवानगी मागितली आहे. परंतु, आरोग्य विभागाने अद्याप कोणताही निर्णय दिलेला नाही. ने स्मरणपत्र पाठवून या तक्रारीवर निर्णय आणि चौकशीस परवानगी कधी मिळणार, याची माहिती मागितली आहे. खरात यांनी थेट अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले असून, परवानगी मिळाल्यास बुलढाणा आरोग्य विभागातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि या प्रकरणात आता निर्णायक टप्प्यावर असून, भ्रष्टाचाराचा पर्दाफाश होणार की केवळ ढोंगी दाखले राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय कोव्हिडं १९ काळातील करोडो रुपये भ्रष्टाचार दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने पुराव्यासह आरोग्य प्रशासना समोर तक्रारकरर्त्यांचा पाठपुराव्याने बहुचर्चित बफतर्फ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशीत दोष सिद्ध होऊनही अद्याप पर्यंत कुठलीच कारवाई झाली नाही.आरोग्यमंत्री ना.आबीटकर उपसंचालक अकोला यांना वेळोवेळी संपर्क करूनही ते कॉल उचलत ही नाही या मथळ्याखाली आम्ही




पाठपुरावा करून बातमीपत्रातून प्रकाशित करीत आहोत परंतु अद्याप पर्यंत त्यांची कुंभकर्णी झोप झाले नसल्याची शक्यता वाटत आहे.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्कहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्क अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते. सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वांदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही. मग जागेचा, ठिकाणाचाही प्रश्न नाही; कारण असे वर्तन उद्या मंत्रालयातील, विधिमंडळातील व विश्रामगृहातील वा खासगी उपाहारगृहात केले तरी कुठलीच कारवाई करता येणार नाही वा होणार नाही. जे आमदार निवासाच्या आवारात चालते तेच शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांत चालवावे लागेल. मनाजोगे उत्तर किंवा अपेक्षित खुलासा मिळत नसतो तेव्हा शाई फेकणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात. एकदा का आपला पक्ष व आपले कार्यकर्ते, आपली ङ्कयुतीफ व ङ्कआघाडीफतील साथीदार व सहकारी यांना मोकळे रान देण्याचे ठरले की मग पक्ष पातळीवरही कारवाई करता येणार नाही. शिस्तभंग सत्तेवरील सहकारी पक्षाच्या नेत्याचा असेल तर मी काहीच करणार नाही; कारण असे माझ्या पक्षाच्या बाबतीत घडले तर मग हालचाल करावीच लागेल. युती-आघाडीचा हा धर्म सत्ताधारी व विरोधक दोघेही पाळतात व पाळतील. याला लोकांचाही आक्षेप नाही असे म्हणायचे, कारण ते आम्हाला वारंवार निवडून देतात. पुढारी हे विसरतात की निवडून मतदार देतात. लोक / जनता त्यांच्या पलीकडेही असते. ङ्कलाडकाफ किंवा ङ्कलाडकीफ असे काही नसते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की ङ्कनिवडणुकीतले यश हा घाण झाकण्याचा किंवा सत्ताउपभोगाचा परवाना नव्हे.फ (शिवनंदन पासवान वि. बिहार सरकार (१९८३) १ सुप्रीम कोर्ट केसेस ४३८ परिच्छेद २०). लोकांना कस्पटासमान समजायचे असे ठरविल्यावर बेताल, बेजवाबदार वर्तनाला व वक्तव्याला कारणीभूत असलेल्यांना काढण्याचा प्रश्नच नाही. मग गंभीर आरोप असलेल्यांनाही सुरक्षित ठेवावे लागते. सारांश काय की, वेगळा पायंडा पाडला तर पंचाईत होईल. पत गेली तरी सत्ता टिकविण्याची अपरिहार्यता विधिमंडळाची, आपल्या राज्याची प्रतिमा डागाळेल याचेही वैषम्य वाटत नाही. हीच खरी शोकांतिका.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'धनुष्यबाण चिन्ह गोठवलं जाणार', संजय राऊत यांची सर्वात मोठी भविष्यवाणी

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सर्वात मोठं भाकीत केलं आहे. पुढील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे धनुष्यबाण चिन्ह राहणार नाही, असा मोठा दावा संजय राऊत यांनी केला आहे. धनुष्यबाण चिन्ह गोठवलं जाईल, असं भाकीत संजय राऊत यांनी केलं आहे. संजय राऊत यांनी 'एबीपी माझा'ला दिलेल्या मुलाखतीत याबाबतचं वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याची सध्या राजकीय वतुर्ळात चर्चा सुरु आहे. शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हावर निवडणूक आयोगाने जो निकाल दिलाय, तसेच आमदार अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी





दिलेल्या निकालाच्या विरोधात सुप्रीम कोर्टात खटला सुरु आहे. या प्रकरणाला सातत्याने तारीख पे तारीख मिळताना दिसत आहेत. पुढच्या महिन्यात कदाचित यावर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता आहे. पण त्याआधीच संजय राऊतांनी मोठा दावा केलाय.एकनाथ शिंदे यांचा पक्ष पुढील निवडणुकीनंतर राहणार नाही. लोकसभा निवडणूक असेल किंवा विधानसभा निवडणूक असेल, एकनाथ शिंदे यांच्याकडे धनुष्यबाण चिन्ह नसणार. एकनाथ शिंदे यांनी जरी सरन्यायाधीशांना पुष्पगुच्छ दिलं असलं तरी भारतीय संविधान जे सांगितलं, संविधानातील १० परिशिष्ट जे सांगितलं त्यानुसार कारवाई होणार. त्यामुळे ते तारखांवर तारखा देत आहेत. त्यांची निर्णय देण्याची हिंमत नाही. त्यानुसार धनुष्यबाण चिन्ह गोठवलं जाईल आणि एकनाथ शिंदे यांना जी कंपनी चालवायला दिली आहे त्याचं शटर डाऊन होईल', असा मोठा दावा संजय राऊत यांनी केला आहे.निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष फुटीनंतर एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्षाचं नाव आणि चिन्ह सोपवलं होतं. तर सुप्रीम कोर्टाने आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल विधानसभा अध्यक्षांना घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार विधानसभा अध्यक्षांनी सुनावणी घेतली. या सुनावणीत एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला दिलासा मिळाला होता. या दोन्ही निकालांच्या विरोधात ठाकरे गट सुप्रीम कोर्टात गेला आहे. लवकरच या प्रकरणात अंतिम सुनावणी होणार आहे.दरम्यान, संजय राऊत यांनी या मुलाखतीत भाजपवर सडकून टीका केली. 'माझ्यासारख्या माणसाच्या हातात या राज्याची किंवा देशातील विशिष्ट खात्याची सत्ता आली तर भाजपचे मी १५ तुकडे करुन टाकेन. मी मागेही बोललो आहे. ते तुकडे कुठे गेले ते त्यांना कळणार नाही. ईडी, सीबीआय, पोलीस यांच्या जोरावर सगळं सुरु आहे. भाजपचं पूर्ण काँग्रेस

## आम्ही एकत्र आलो तर तुमचं काय जातं?' अजितदादा कडाडले

**इंदापूर :** इंदापुरात जर हर्षवर्धन पाटील, दत्तात्रय भरणे एकत्र आले, आप्पासाहेब जगदाळे व इतर लोकांनी साथ दिली तर बिघडलं कुठं, असा थेट सवाल उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज कन्हेरी येथील मारुती मंदिरात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.पवार म्हणाले ङ्गआम्ही एकत्र आलो की काही लोकांना फावत नाही. त्यांना वाटतं आपली किंमत कशी येणार? पण त्यासाठी आम्ही एकमेकांच्या उरावर बसायचं का?ङ्ख असा परखड सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रवीण माने आणि प्रदीप गारटकर हे आम्हीच तयार केलेले कार्यकर्ते आहेत. प्रवीण मानेला मीच सभापती केलं होतं. कार्यकर्त्यांची संख्या वाढली की ती थांबवता येत नाही. नवीन कार्यकर्त्यांच्या अपेक्षा असतात, असं अजित पवार म्हणाले. नवीन कार्यकर्ते म्हणतात, दादा, ही संधी आहे. मधली



चार वर्षे आमची वाया गेली. त्यामुळे नवीन कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत आणि इतरांनाही संधी देता आली पाहिजे, असं त्यांनी स्पष्ट केलं.आरक्षणाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले, आरक्षणाप्रमाणेच संधी दिलेली आहे, त्यापेक्षा बाहेर काहीच नाही. उदाहरण देताना त्यांनी सांगितलं की, शेजारच्या माळिशरस तालुक्यात खाटीक समाज मागासवर्गीयामध्ये मोडतो आणि त्यांच्याकडे एससी सर्टिफिकेट आहे. २०१९ मध्ये उत्तमराव जानकर पराभूत झाले, पण २०२४ मध्ये ते निवडून आले.

## पवारांच्या नगरसेवकांनी अचानक भूमिका बदलल्याने महापौर भाजपचा होणार

**अकोला :** महापालिकेमध्ये सत्ता स्थापनेसाठी सुरू असलेली राजकीय चढाओढ आता एका वेगळ्या वळणावर येऊन पोहोचली आहे. निवडणुकीनंतर महानगरपालिकेत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपने मित्र पक्षांच्या मदतीने सत्ता स्थापनेसाठी दावा केला असून, महायुतीच्या नेतृत्वात ४४ नगरसेवकांची 'शहर सुधार आघाडी' स्थापन केली आहे. या गटाची नोंदणी शुक्रवारी संध्याकाळी अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आल्याची माहिती आहे.दुसरीकडे अकोल्यात भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी काँग्रेससह इतर समविचारी पक्ष एकत्र आले होते. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मात्र पद वाटपावरून एकमत न झाल्याने ही आघाडी किती तग धरेल हे सांगणे कठीण आहे. दोन दिवसांपूर्वी अॅड. आंबेडकर यांच्या निवासस्थानी काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, उबाठा, वंचित व अपक्षांची एक संयुक्त बैठक झाली होती.

## फक्त मुंब्राच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करु : इम्तियाज जलील

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीतील विजयानंतर एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांच्या वक्तव्यावरून सुरू असलेल्या वादात आता पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांनी उडी घेतली आहे. 'सहर शेखने जे वक्तव्य केले, त्याला माझा पूर्ण पाठिंबा आहे. सहरने माफी मागावी असे आम्हाला वाटत नव्हते, तिच्यावर दबाव आणला गेला,' असा खळबळजनक दावा जलील यांनी मुंब्र्यात पत्रकार परिषदेत केला आहे.एमआयएम वर होणाऱ्या जातीयवादाच्या आरोपांना उत्तर देताना जलील म्हणाले, 'आम्ही सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन पुढे जात आहोत. मुंबईत आम्ही विजय उबाळे या हिंदू बांधवाला मुस्लीम बहुल भागातून निवडून आणले आणि त्यांना गटनेताही बनवले. मुंब्र्यातून मयूर सारंग निवडून आले आहेत. राज्यातील १२५ जागांवर आमचे अनेक हिंदू उमेदवार विजयी झाले आहेत. हा पराभव पचवणे विरोधकांना कठीण जात असल्याने ते आमची बदनामी करत आहेत.'सहरच्या



वक्तव्यावर रान पेटवणारे पोलीस नितेश राणे जेव्हा मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतात, तेव्हा गप्प का असतात? त्यांच्यासाठी कायदा वेगळा आहे का? जर तोतला पुन्हा मुंब्र्यात आला, तर त्याची 'ब्लू फिल्म' चौकात दाखवू,' असे विधान करत त्यांनी किरीट सोमय्यांना अप्रत्यक्षपणे टोला लगावला आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना जलील म्हणाले, 'उपमुख्यमंत्री म्हणतात ठाणे जिल्हा भगवा आहे, मग सहरने मुंब्रा हिरवा करू म्हटले तर ते अयोग्य कसे? हिरवा हा समृद्धीचा रंग आहे, तो काय आतंकी शब्द आहे का? आम्ही येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्र हिरवा (एमआयएममय) करून दाखवू.

# मुंबई महापालिकेत विरोधकांसाठी भाजपची नवी खेळी?

**मुंबई :** मुंबई महापालिकेत बहुमताचा आकडा गाठणाऱ्या महायुतीतील भाजप आणि शिवसेना यांच्याकडून २७ जानेवारी रोजी गट नोंदणी केली जाणार असल्याचे कळते. मात्र, दोन्ही पक्षांच्या वेगवेगळ्या गटाची नोंदणी न करता महायुती म्हणून एकच गटाची नोंदणी करण्याबाबतची चाचपणी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरून परतल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चे नंतरच याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. भाजपने याबाबत दुजोरा दिला असला तरी शिवसेनेकडून मौन बाळगण्यात आले आहे.महापालिकेत भाजपचे ८९ तर शिवसेनेचे २९ असे ११८ नगरसवेकांचे संख्याबळ आहे. मात्र,





अजूनही दोन्ही पक्षांनी कोकण भवन येथे गट नोंदणी केलेली नाही. परिणामी ३१ जानेवारी रोजी होणारी महापौर निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांनी गट नोंदणी न केल्याने राजकीय वतुर्ळात तर्क-वितर्क लढविले जात आहेत. अखेरीस गट नोंदणीसाठी २७ जानेवारीचा मुहूर्त निश्चित करण्यात आल्याचे समजते. मुख्यमंत्री आज, २५ जानेवारीला दावोस दौऱ्यावरून परतणार आहेत. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी ते महापौरपदासंदर्भात चर्चा करतील, त्याचवेळी एकच गट नोंदणी करण्यासंदर्भातही या बैठकीत चर्चा होईल, अशी माहिती पक्ष सूत्रांकडून देण्यात आली.महानगरपालिकेत स्थायी समिती, शिक्षण समिती, आरोग्य समितीसह इतर अनेक समित्या कार्यरत असतात. या समितीमध्ये पक्षांच्या संख्याबळानुसार सदस्यांची निवड केली जाते. मुंबईत भाजप आणि शिवसेनेने वेगवेगळ्या गटाची नोंदणी केल्यास सदस्य संख्येवर त्याचा परिणाम होऊ शकतो. परिणामी महायुती म्हणून एकच गट नोंदणी केल्यास समितीमध्ये सदस्य संख्या वाढण्याची शक्यता असल्याने त्यासंदर्भातील चाचपणी दोन्ही पक्षांकडून सुरु असल्याचे कळते.एकच गट नोंदणी करण्यासंदर्भात शिवसेनेच्या नेत्यांकडून कोणत्याही प्रकारचा दुजोरा देण्यात आलेला नाही.

एकीकडे महायुतीचे संख्याबळ ११८ इतके आहे. तर विरोधकांचे संख्याबळही १००च्या घरात आहे. परिणामी समित्यांमध्ये विरोधकांनाही मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखाद्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेताना भाजपची दमछाक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर पक्षाचा पाठिंबा मिळावा याकरिता प्रयत्न सुरु असल्याने गट नोंदणीकरिता विलंब लागत असल्याची माहिती शिवसेनेतील ज्येष्ठ नेत्यांकडून देण्यात आली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आठ वर्ष लहान प्रियकर अनब विधवा सून; अनैतिक संबंधांच्या नशेत सासूचा निर्घृण खून

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील हदगाव शहरात एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. आपल्या अनैतिक संबंधांत अडथळा ठरणाऱ्या सासूचा सुनेने चक्क प्रियकराच्या मदतीने गळा आवळून खून केला. इतकेच नव्हे, तर खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी भावाच्या मदतीने मृतदेह शहराबाहेर नदीपात्रात फेकून दिला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे १३ दिवसांनी या गुन्ह्याचा छडा लावत सुनेसह चौघांना बेड्या ठोकल्या आहेत.मयत कमलाबाई क्षीरसागर (वय ५४) या हदगाव तहसील कार्यालयात शिपाई म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या एकुलत्या एक मुलाचे दोन महिन्यांपूर्वीच आजारपणामुळे निधन झाले होते. तेव्हापासून विधवा सून सुनीता (वय ३५) आणि कमलाबाई एकत्र राहत





होत्या.मात्र, सुनीताचे गेल्या अनेक वर्षांपासून स्वतः पेक्षा ८ वर्ष लहान असलेल्या परमेश्वर वानखेडे (वय २६) याच्याशी प्रेमसंबंध होते. पतीच्या निधनानंतर हे संबंध अधिकच वाढले होते.सुनीताच्या या वागण्यामुळे सासू-सुनेमध्ये सतत खटके उडत होते. अनैतिक संबंधांत सासू अडथळा ठरत असल्याच्या रागातून सुनेने प्रियकरासोबत हत्येचा कट रचला. १० जानेवारीच्या रात्री कमलाबाई गाढ झोपेत असताना सुनीता आणि परमेश्वरने त्यांच्या गळ्याला स्कार्प गुंडाळून त्यांचा जीव घेतला. त्यानंतर सुनीताने आपला भाऊ अमोल इटकरे याला बोलावून घेतले आणि नातेवाईक अक्षय कदमच्या मदतीने मृतदेह पोत्यात भरून वाळकी फाटा येथील नदीपात्रात फेकून दिला.१३ जानेवारीला नातवाने कमलाबाई बेपत्ता असल्याची तक्रार दिली, पण काही वेळातच त्यांचा मृतदेह सापडल्याने हत्येचा संशय बळावला. सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्या पथकाने तांत्रिक तपास सुरू केला. सीसीटीव्ही आणि मोबाईल लोकेशनमध्ये सुनीताचा प्रियकर आणि भावाच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. कसून चौकशी केली असता सुनेने हत्येची कबुली दिली. न्यायालयाने चारही आरोपींना २८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## रेल्वे स्टेशनवर प्राध्यापकाला संपवलं




**मुंबई :** मुंबईतील पश्चिम रेल्वमार्गावरील मालाड स्थानकात शनिवारी रात्री आलोक सिंह (वय ३१) या प्राध्यापकाचा चाकू भोसकून हत्या करण्यात आली. या घटनेमुळे मुंबईत खळबळ उडाली. मालाड रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ येथे ही घटना घडली. आता याप्रकरणी पोलिसांनी आता आरोपी ओंकार शिंदे (वय २७) याला अटक करण्यात आली आहे. ट्रेनमधून उतरताना धक्का लागल्याच्या कारणावरुन आलोक सिंह आणि ओंकार शिंदे यांच्यात जोरदार वाद झाला होता. या वादात ओंकारचा संताप हाताबाहेर गेल्याने त्याने आलोक सिंह यांच्या पोटात चाकू खुपसला होता. त्यानंतर ओंकार शिंदे हा फरार झाला होता. या घटनेनंतर रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला होता. रेल्वे पोलिसांनी स्थानकातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला. पोलिसांनी ओंकार शिंदे याला वसई स्थानकातून ताब्यात घेण्यात आलं. सध्या आरोपीला बोरीवली पोलीस ठाण्यात आणण्यात आलं असून त्याची कसून चौकशी सुरु करण्यात आली आहे. दोघांचा वाद इतका विकोपाला का गेला? याचं नेमकं कारण कळू शकलं नव्हतं. फक्त धक्का लागल्याचा राग आल्याने ओंकार शिंदे याने इतकं टोकाचं पाऊल उचलले का? याचा तपास आता केला जात आहे. या चौकशीतून आता काय समोर येणार? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

## हॉस्टेलवर राहून मैत्रिणीचाच घात, रुममेटचे कपडे बदलतानाचे व्हिडिओ-फोटो काढले अनब 'त्याला' पाठवले


**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सिडको एन-८ परिसरात एक अत्यंत संतापजनक आणि लज्जास्पद प्रकार उघडकीस आला आहे. ज्या मैत्रिणीसोबत एकाच रूममध्ये राहून सुख-दुःख शेअर केली तिनेच विश्वासघाताची सीमा ओलांडली आहे. हॉस्टेलवर राहणाऱ्या एका तरुणीनं आपल्या रूममेटचे कपडे बदलतानाचे गुपचूप व्हिडिओ आणि फोटो काढून ते आपल्या एका प्रियकराला पाठवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहेस्वराज धालगडे असं प्रियकराचे नाव आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील पीडित तरुणी आणि आरोपी या एम.जी.एम हॉस्टेलमध्ये रूममेट म्हणून एकत्र राहत होत्या. १८ जानेवारी रोजी, पीडित तरुणी कपडे बदलत असताना आरोपी मैत्रीनीने संधी साधून आपल्या मोबाईलमध्ये तिचे खासगी फोटो आणि व्हिडिओ टिपले. हे व्हिडिओ तिने तात्काळ तिचा प्रियकर स्वराज धालगडे याला पाठवून दिले.काही वेळाने हा धक्कादायक प्रकार पीडितेच्या लक्षात आला. तिने जेव्हा आरोपी




मैत्रिणीला विचारले की 'तू माझे फोटो आणि व्हिडिओ का काढले? आणि ते प्रियकराला का पाठवले?' तेव्हा आरोपी मैत्रीण आणि तिचा प्रियकर स्वराज यांनी तिला सहकार्य करण्याऐवजी उलट मारहाण केली. इतकेच नाही तर 'जर तू याप्रकरणी पोलिसांत तक्रार दिलीस, तर मी आत्महत्या करेन' अशी धमकी देऊन आरोपीने पीडितेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.या त्रासाला कंटाळून पीडित तरुणीने अखेर सिडको पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणाचं गांभीर्य ओळखून पीडितेची आरोपी मैत्रीण आणि स्वराज धालगडे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नरळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.ज्या मित्रावर पतीने विश्वास टाकला त्याच मित्राने मैत्रीच्या नात्याला काळिमा फासल्याची संतापजनक घटना समोर आली आहे.

## साताऱ्यातील २७ वर्षीय तरुण अचानक गायब; ८ दिवसांनी पुण्यातील लॉजमध्ये बॉडी आढळली, दुर्गंधी आली अन..

**पुणे :** साताऱ्यातील वाई येथून आठ दिवसांपूर्वी अचानक बेपत्ता झालेल्या एका २७ वर्षीय तरुणाचा पुण्यात मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुणे शहरातील गजबजलेल्या कॅम्प परिसरातील एका लॉजमध्ये या तरुणाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. पीयूष ओसवाल (रा. वाई, जि. सातारा) असे या मृत तरुणाचे नाव असून, त्याच्या मृत्यूमुळे ओसवाल कुटुंबीयांवर दुखाचा डोंगर कोसळला आहे.पुण्यातील लष्कर (कॅम्प) परिसरातील 'मुकेश लॉज'मध्ये ही खळबळजनक घटना उघडकीस आली. बुधवारी दुपारी लॉजमधील एका बंद खोलीतून अचानक उग्र आणि असह्य दुर्गंधी येऊ लागली. यामुळे लॉजवरील कर्मचारी आणि व्यवस्थापनाला संशय आला. कर्मचाऱ्यांनी संबंधित खोलीचा दरवाजा ठोठावला, आवाज दिला, परंतु आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लॉज प्रशासनाने तात्काळ बंडगार्डन पोलिसांना याची माहिती दिली.माहिती मिळताच बंडगार्डन पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी खोलीचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, समोरचे दृश्य अंगावर काटा आणणारे होते. पीयूष ओसवाल याने गळफास



घेतलेल्या अवस्थेत आपले जीवन संपवले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतदेहाची अवस्था पाहता आणि खोलीत पसरलेली दुर्गंधी लक्षात घेता, पीयूषने सुमारे दोन ते तीन दिवसांपूर्वीच आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.मूळचा वाईचा असलेला पीयूष ओसवाल हा गेल्या आठ दिवसांपासून घरातून निघून गेला होता. तो घरी न परतल्याने आणि त्याचा कोणताही संपर्क न झाल्याने त्याच्या कुटुंबीयांनी वाई पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. वाई पोलिसांनी तातडीने तो बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवून तपास सुरू केला होता. एकीकडे वाई पोलीस आणि नातेवाईक त्याचा शोध घेत असतानाच, दुसरीकडे पुण्यात त्याचा मृतदेह आढळल्याने या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले आहे.

घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर बंडगार्डन पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवला आहे. पीयूष पुण्यात कधी आला? तो या लॉजवर कधीपासून थांबला होता? आणि त्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. वाई पोलिसांनाही या घटनेची माहिती देण्यात आली असून, दोन्ही पोलीस ठाण्यांच्या समन्वयातून पुढील तपास केला जात आहे. तरुण वयात पीयूषने उचललेल्या या टोकाच्या पाऊलामुळे वाई परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पराभवानंतर सँटनरने मान्य केली टीम इंडियाची दहशत, म्हणाला आता ३००

**रायपूर/वृत्तसंस्था :** भारतविरुद्ध न्यूझीलंड यांच्यात टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील दुसरा सामना काल रायपूरच्या मैदानावर रंगला. या सामन्यात भारताचा विजय झाला. भारत आता या मालिकेत २-० ने आघाडीवर आहे. भारतीय संघाचे फलंदाज सामन्यात आक्रमक पाहायला मिळाले. सामना गमावल्यानंतर न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने काय विधान केले ते पाहा...न्यूझीलंडचा कर्णधार चळींलहशश्रश्र डरपींपशी भारतीय फलंदाजांचे कौतुक केले की, २८ चेंडू शिल्लक असताना २०९ धावांचे कठीण लक्ष्य गाठले आणि विनोदाने म्हटले की भारताविरुद्ध ३०० धावाही पुरेशा नसतील, कारण चांगल्या खेळपट्ट्यांवर भारताची आक्रमक आणि मजबूत फलंदाजी दिसून येते. ' कर्णधार Suryakumar Yadav ८२ धावा करुन नाबाद राहिला आणि इशान किशनच्या वादळी ७६ धावांच्या खेळीमुळे न्यूझीलंडने दुसरा टी-२० सामना सात विकेट्सने जिंकून पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. भारताच्या टी२० इतिहासातील हा दुसरा सर्वात यशस्वी लक्ष्याचा पाठलाग होता.न्यूझीलंडच्या कर्णधाराने सांगितले की, 'भारतासारख्या संघाचा सामना करण्यासाठी गोलंदाजीकडून अधिक दृढनिश्चय आवश्यक आहे, संघांविरुद्ध २००-२१० धावसंख्या आता सुरक्षित वाटत नाही. आता आम्हाला ३०० धावा कराव्या लागतील. जेव्हा तुम्ही भारतासारख्या संघाचा सामना करता, जो चांगल्या खेळपट्टीवर जोरदार फलंदाजी करतो, तेव्हा त्यांनी पहिल्या चेंडूपासून दाखवलेला दृढनिश्चय आमच्यासाठी आव्हानात्मक होता; आम्हाला सामना उलटवण्याचा प्रयत्न करावा लागला. आम्हाला कदाचित थोडे अधिक आक्रमक खेळावे लागले.''हो, मलाही तसेच वाटते. तुम्ही म्हटल्याप्रमाणे, अजूनही काही खेळाडू खेळायचे आहेत. आणि मग, तुम्हाला खात्री करायची आहे की प्रत्येकजण विश्वचषकासाठी पूर्णपणे तयार आहे. आम्ही थोडा फेरबदल केला; आम्हाला जिंकायचे होते आणि आमच्यावर खूप दबाव होता; आमच्यासाठी शिकून कमबॅक करण्याची चांगली संधी आहे. ७ व्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी मला अनुकूल परिस्थितीचा फायदा घ्यावा लागतो, गोलंदाजीच्या जबाबदाऱ्या स्पिनर-अनुकूल खेळपट्ट्यांवर धावा करून संतुलित कराव्या लागतात, तर त्याचे लक्ष आधीच पुढील मैदानावर आणि ड्यूवर आहे.'




## सामना संपताच सूर्याने एकाचे धरले पाय

**रायपूर :** भारतविरुद्ध न्यूझीलंड यांच्यात टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील दुसरा सामना काल रायपूरमध्ये रंगला ज्यात भारताने सहज विजय मिळवला. भारताला या विजयासह मालिकेत २-० ने आघाडी मिळाली. सामन्यात डीूरर्ज्ञीरी धरवरीं आणि खीहरप घळीहरप जोरदार कामगिरी केली. सूर्याला अखेर सुर गवसलेला पाहायला मिळाला. सामन्यानंतर सूर्याने जे केलं त्याचा आता व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

सूर्यकुमार यादव अखेर फॉर्ममध्ये परतला आणि दुसऱ्या टी-२० मध्ये ८२ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. त्याने ३७ चेंडूत ८२ धावा केल्या, ज्यामध्ये नऊ चौकार आणि चार षटकार होते. सामन्यानंतर, सूर्या थेट टीम इंडियाचा अनुभवी थ्रोडाऊन स्पेशालिस्ट रघुच्या पाया पडला. पण रघुने त्याला अडवल्याचे पाहायला मिळाले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.दुसऱ्या टी-२० मध्ये फॉर्ममध्ये परतल्यानंतर, सूर्या फलंदाजी करताना शांत आणि आत्मविश्वासू दिसत होता. सूर्याने गेल्या अनेक डावांमध्ये एकही अर्धशतक ठोकले नव्हते, सूर्याने काल दुष्काळ संपवला. सूर्याच्या फॉर्ममध्ये परतण्याचे श्रेय रघुला जाते, ज्याने त्याला नेट प्रॅक्टिस दरम्यान व्यापक फलंदाजी सराव दिला, ज्याचा फायदा भारतीय कर्णधाराला झाला. सूर्याने दुसऱ्या टी-२० मध्ये अर्धशतक झळकावले आणि संघाला विजय मिळवून दिला. यामुळे सूर्याने सामन्यानंतर लगेचच रघुच्या पायाशी नतमस्तक होऊन त्याच्या खेळीचे श्रेय त्याला दिले.

## भारतासोबतचा पंगा महागात; बांगलादेशला जबर दणका; छोट्या देशाला मोठी संधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** टी-२० वर्ल्डकप २०२६ वरुन बांगलादेश आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट काऊन्सिल ( आयसीसी ) यांच्यामध्ये बऱ्याच दिवसांपासून वाद सुरु होता. टी-२० वर्ल्डकपसाठी भारतात येणार नाही, अशी भूमिका बांगलादेशनं घेतली. या प्रकरणात आयसीसीनं अंतिम निर्णय घेतला आहे. अडेलतट्टू भूमिका घेणाऱ्या बांगलादेशला आयसीसीनं दणका दिला आहे. टी-२० वर्ल्डकप २०२६ मध्ये बांगलादेशच्या जागी स्कॉटलँडची एन्ट्री झाली आहे. त्यामुळे स्कॉटलँडला लॉटरीच लागली आहे.क्रिकबझनं दिलेल्या वृत्तानुसार, आयसीसीनं बांगलादेशची गच्छंती केली आहे. भारतात खेळण्यास बांगलादेशनं नकार दिला. त्यामुळे आयसीसीनं आता त्यांच्या जागी स्कॉटलँडला संधी दिली आहे. भारतात खेळण्याची तयारी ठेवा, अन्यथा तुमच्या जागी स्कॉटलँडला देऊ, असा इशारा आयसीसीनं बांगलादेशला दिला होता. याबद्दल निर्णय घेण्यासाठी त्यांना काही दिवसांचा अवधी दिला होता. पण बांगलादेशनं आपली भूमिका बदलली नाही. भारतात येणार नाही, यावर ते ठाम राहिले. त्यामुळे आयसीसीनं त्यांची वर्ल्डकपमधून गच्छंती केली आहे.बीसीसीआयच्या सुचनेवरुन कोलकाता नाईट रायडर्सनं बांगलादेशी खेळाडू मुस्तिफिजूर रहमानला रिलीज केलं. त्याला संघातून बाहेर काढण्यात आलं. कोलकात्यानं आयपीएल २०२६ साठी मुस्तिफिजूरला संघात घेतलं होतं. त्याच्यासाठी ९.२० कोटी मोजले होते. पण गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशात हिंदूंवर होत असलेले हल्ले, त्यांच्या हत्या लक्षात घेता बीसीसीआयनं कठोर भूमिका घेतली. त्यामुळेच कोलकात्याला मुस्तिफिजूरला संघातून काढण्याची सूचना करण्यात आली.



# बांगलादेशवर कारवाई झाल्यानंतर पाकिस्तान आला वठणीवर; T20 World Cup पूर्वी बदलली मोठी भूमिका

**मुंबई/वृत्तसंस्था :** ७ फेब्रुवारी २०२६ रोजी T20 World Cup सुरू होणार आहे. या विश्वचषकापूर्वी ICC एक मोठा निर्णय घेतला आणि बांगलादेशला विश्वचषकाच्या बाहेर केले आहे. बांगलादेशला बहिष्कार टाकणं खूपच महागात पडले. यानंतर पाकिस्तानही विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत होता पण आयसीसीचे टोकाचे पाऊल पाहता त्यांनी त्यांची भूमिका बदलून आता विश्वचषकापूर्वी मोठा निर्णय घेतला आहे.





पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २५ जानेवारी रोजी या स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. संघ जाहीर करुन बहिष्कार टाकण्याची भूमिका बदलण्याचा निर्णय पाकिस्तानने घेतला असल्याचे दिसत आहे. या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी निवडकर्त्यांनी बाबर आझम, फहीम अश्रफ आणि मोहम्मद नवाज सारख्या अनुभवी खेळाडूंना संघात समाविष्ट केले आहे, तर मोहम्मद रिझवान आणि हरिस रौफ सारख्या खेळाडूंना वगळले आहे. पाकिस्तान या विश्वचषकात सलमान अली आघाच्या नेतृत्वाखाली खेळेल.२५ जानेवारी रोजी सकाळी लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर पत्रकार परिषदेद्वारे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संघाची घोषणा केली. पीसीबीचे उच्च कामगिरी संचालक आणि पुरुषांच्या राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य, आकिब जावेद, पाकिस्तानचे टी-२० कर्णधार सलमान अली आघा आणि व्हाईट-बॉल मुख्य प्रशिक्षक माइक हेसन पत्रकार परिषदेत उपस्थित होते.आगामी विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या संघात या मोठ्या स्पर्धेत प्रथमच सहा खेळाडूंचा समावेश आहे. कर्णधार सलमान अली आघा, फहीम अश्रफ, ख्वाजा मोहम्मद नाफे, मोहम्मद सलमान मिर्झा, साहिबजादा फरहान आणि उस्मान तारिक पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकात खेळणार आहेत. २०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी, पाकिस्तान ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर टी-२० मालिका खेळेल. पाकिस्तान टी-२० विश्वचषकात आपल्या मोहिमेची सुरुवात ७ फेब्रुवारी रोजी नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्याने करेल. हा सामना कोलंबोमध्ये खेळला जाईल. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी त्यांचा सामना अमेरिकेशी होईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अंतिम सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्येच होईल. गट टप्प्यातील पाकिस्तानचा शेवटचा सामना १८ फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होईल.

# प्रजासत्ताक दिनी व्यक्त करणार देशासाठी प्रेम, आता किती बॉर्डर २ ची कमाई?



**मुंबई :** १९९७ मध्ये आलेल्या 'बॉर्डर' चित्रपटाचा पुढचा भाग ' बॉर्डर २ ' बाबत गेले काही दिवस प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. आता हा सिनेमा रिलीज झाल्यापासून प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. सनी देओलसोबत या सिनेमात वरुण धवन, अहान शेट्टी आणि दिलजीत दोसांझ मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटाला जोरदार एडव्हान्स बुकिंग मिळाले, शुक्रवारी या सिनेमाला पहिल्या दिवशी ३० कोटींची चांगली ओपनिंग मिळाली. या सिनेमाची किती कमाई झाली ते जाणून घेऊ. उत्तर भारतात मुसळधार पाऊस आणि अनेक ठिकाणी रिलीजला झालेल्या विलंबामुळे चित्रपटाच्या कमाईत काही लाखांची घट झाली. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या सर्वाधिक ओपनिंग करणाऱ्या पंधरा चित्रपटांवर नजर टाकता, 'बॉर्डर २' ने चांगली सुरुवात केली आहे. अनुराग सिंह दिग्दर्शित 'बॉर्डर २' हा चित्रपट २७५ कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. त्यामुळे हा सिनेमा 'धुरंधर' चा रेकॉर्ड मोडू शकेल का हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. 'बॉर्डर २' च्या रिलीजमुळे 'धुरंधर' च्या कमाईचा वेग आधीच मंदावला आहे.बॉर्डर २' ची खरी परीक्षा आता रविवार आणि प्रजासत्ताकदिनाच्या सुट्टीपासून सुरू होईल. सॅकनिल्कच्या मते, शुक्रवारी ३० कोटी रुपयांच्या दमदार ओपनिंगनंतर, शनिवारी चित्रपटाची कमाई आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार, चित्रपटाने ३५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे सिनेमाचे एकूण कलेक्शन आता ६५ कोटींच्या आसपास पोहचले आहे.दुसऱ्या दिवशी सकाळच्या शो १५.५१%, दुपारच्या शो ३९.९७%, संध्याकाळच्या शो ४९.१३% आणि रात्रीच्या शो ६१.७०% गर्दी होती. सॅकनिल्कच्या मते, 'बॉर्डर २' ने परदेशातही चांगली सुरुवात केली, पहिल्या दिवशी परदेशात ७.५० कोटींची कमाई केली. या परदेशातील कमाईमुळे चित्रपटाच्या जगभरातील कलेक्शनमध्ये वाढ झाली, जी रिलीजच्या पहिल्या दिवशी ४३.५० कोटींवर पोहोचली.बॉर्डर २' ने २०२५-२६ च्या टॉप टेन ओपनिंग चित्रपटांमध्ये दुसरे स्थान मिळवले आहे. 'छावा' पहिल्या क्रमांकावर आहे. 'धुरंधर'नेही पहिल्या दिवशी 'बॉर्डर' पेक्षा कमी कमाई केली आणि २८ कोटी कमावले, परंतु त्यानंतरच्या दिवसांत हा चित्रपट प्रचंड हिट ठरला.

## पलाशने निर्मात्याला पाठवली १० कोटींची नोटीस



**मुंबई :** संगीतकार पलाश मुच्छलचे लग्न म ोडल्यापासून तो सतत चर्चेत आहेत. अलिकडेच एका अभिनेता-निर्मात्याने त्यांच्यावर ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आणि कुटुंबालाही अडकवल्याचा आरोप केला होता. आता या गायकाने त्या निर्मात्यावर चुकीचे आणि निराधार आरोप केल्याचे म्हणत कारवाई केली आहे. तसेच पलाशने त्याला तब्बल १० कोटींची लीगल नोटीसही पाठवली आहे. 'हे आरोप जाणूनबुजून माझी प्रतिष्ठा आणि चारित्र्य बदनाम करण्यासाठी केले जात आहेत' असे त्याने या आरोपांमध्ये म्हटले.यापूर्वी, पलाशने विज्ञानला कायदेशीर कारवाईचा इशारा दिला होता. त्याने निर्मात्याचे आरोप आणि दावे निराधार असल्याचे निवेदनात्मक पोस्टमध्ये म्हटले. तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे आणि कोणतेही तथ्य नसल्याचा उल्लेख त्याने केला होता. पलाशचे वकील कायदेशीर कारवाईवर काम करत आहेतहिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत, निर्मात्याने आरोप केला की गायकाला त्याच्या लग्नाच्या एक दिवस आधी दुसऱ्या महिलेसोबत बेडवर रंगेहाथ पकडण्यात आले आणि त्यानंतर भारतीय महिला क्रिकेटपटूंनी त्याला चोप दिला. सिनेमा बनवण्यासाठी पलाशने निर्मात्याकडून ४० लाख रुपये मागितलेले पण त्याने ते परत दिलेच नाही पण सोबतच आणखी १० लाख रुपयेही मागून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. याशिवाय त्याने पलाशच्या कुटुंबावरही आरोप केले. पलाशची आई त्याला धमकी देत असल्याचे त्याने म्हटले. पलाशने बनवलेल्या सिनेमात विज्ञानची भूमिका होती. पैस न दिल्यास तो रोल कापण्याची धमकी त्याच्या आईने दिली. तसेच त्याची बहिण रुग्णसेवेच्या नावे पैसे उकळत असल्याचे गंभीर आरोपही त्याने केले.विज्ञान माने हा एक अभिनेता आणि निर्माता आहे. तो मराठी चित्रपट इंडस्ट्रीशी संबंधित आहे.

## धुरंधर फेम अभिनेत्याला अटक



**मुंबई :** मनोरंजन विश्वाला धक्का देणारी घटना समोर आली आहे. धुरंधर चित्रपटातील अभिनेता नदीम खान यांना घरकाम करणाऱ्या महिलेशी जवळपास १० वर्षे बलात्कार व लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणी कारवाई करत नदीम खान यांना ताब्यात घेतले असून सध्या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

तक्रारदार महिला अभिनेता नदीम खानच्या घरी घरकाम करत होती. नदीम खानने तिला लग्नाचे खोटे आश्वासन देत अनेक वर्षे शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पीडितेच्या म्हणण्यानुसार, २०१५ पासून आरोपीने तिचा विश्वास संपादन करून वारंवार तिच्यावर अत्याचार केला. म हिलेने सुरुवातीला या प्रकरणाची तक्रार करण्यास भीती वाटत होती. मात्र, आरोपीने लग्नास स्पष्ट नकार दिल्यानंतर आणि मानसिक छळ वाढल्यानंतर तिने अखेर पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी झिरो एफआयआर दाखल करण्यात आली.

## शांत दिसणाऱ्या रोशनचा चढला पारा, तन्वीला घराबाहेर काढण्याची इच्छा व्यक्त, कारणीभूत ठरला 'तो' स्पर्धक



**मुंबई :** बिग बॉस मराठी सीजन ६ चा शो सुरू होऊन आता २ आठवडे उलटले. सध्या दुसऱ्या आठवड्याचा भाऊचा धक्का सुरू आहे. कालचा एपिसोड मध्ये पाहिले असता रितेश देशमुख याने अनुश्री माने आणि रुचिता जामदार हिची जोरदार शाळा घेतली. गेला आठवडाभर या दोघींनी बिग बॉसच्या घरात जो हैदोस घातला होता त्यावरून त्यांना भरपूर सुनावण्यात आले. तसेच ज्यांनी उत्तम कामगिरी केली त्यांचे कौतुकही झाले.आता बिग बॉस मराठी सीजन ६ च्या भाऊच्या धक्क्याचा नवीन प्रोमो समोराला आहे. शनिवारच्या एपिसोड मध्ये रितेश देशमुख सर्व स्पर्धकांची कान उघडणी करतो तर रविवारच्या दिवशी काही टास्क होऊन मग एलिमिनेशनचा गेम रंगतो. पहिल्या आठवड्यात कोणीही एलिमिनेट झाले नव्हते. त्यामुळे आता दुसऱ्या आठवड्यात कोणता सदस्य घराबाहेर जाणार हे पाहणे उत्सुकतेच ठरणार आहे.बिग बॉस मराठीच्या या नवीन प्रोमो मध्ये कोणते कलाकार टाकाऊ आहेत हे स्पर्धकांना सांगायचे असते. त्यासाठी कलाकारांचे फोटो असलेल्या गोण्या दिलेल्या असतात. प्रत्येक कलाकार त्यांना कोणता कलाकार घरात नको आहे हे सांगून त्यामागील कारण देखील सांगतो. घरात सगळ्यात शांत आणि विचारपूर्वक वावरणारा रोशन दादा मात्र यावेळी थोडा संतापलेला दिसला. त्याने तन्वी कोलतेची गोणी फेकून दिली. त्या मागचे कारण सांगताना तो म्हणाला की, तन्वी मला भाऊ म्हणते आणि ऐनवेळी तिने मला पाठिंबा दिला नाही. यावर तन्वी म्हणाली की तुझी कॅप्टनसी विशाल चालवणार आहे म्हणून मी तुला पाठिंबा दिला नाही. या मुद्द्यावरून दोघांची तू तू मैं मैं होते. रोशन तिच्यावर भडकतो आणि म्हणतो की हा तुझा गैरसमज आहे. बिग बॉस ने मला उगीच इथे आणलेलं नाही. तुम्हाला दुबळा समजते आहेस.

हा प्रोमो पाहिल्यावर अनेक प्रेक्षक कमेंट मधून त्यांच्या भावना किंवा मत व्यक्त करत आहेत. रोशन दादा चुकीच्या ग्रुप मध्ये खेळत असल्याचं मत अनेकांनी व्यक्त केले आहे. बऱ्याच जणांनी रोशनला पाठिंबाही दिला आहे. काहीजण म्हणत आहेत की तनवीने काहीही चुकीचं केलेलं नाही. टोळी मधले सर्वजण विशालच्या म्हणण्याप्रमाणेच करतात.प्रोमो मध्ये पाहिलेला तन्वी आणि रोशनचा हा वाद आता कुठे टोकाला जातो, पुढल्या दिवशी दोघे एकत्र होतात का की हे भांडण पुढे पर्यंत टिकते हे पाहणे आता उत्सुकतेच ठरेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हिंदूहृदय सम्राट मा. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांना जयंती दिनानिमित्त शिवालयात अभिवादन



**जनसंचलन/ बुलढाणा**

हिंदू हृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे व थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आज दि.२३जाने २०२६ रोजी जयंती दिना निमित्त भाजपा जिल्हाध्यक्ष मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा कार्यालय शिवालयात जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रम प्रसंगी प्रथम मा.बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस या महामानवांच्या प्रतिमेचे भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कडवट हिंदुत्ववादी विचारांचा बाणा असणारे, तमाम जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे मा.बाळासाहेब ठाकरे यांनी राजकारणातील काँग्रेस ची मक्तेदारी संपुष्ठात आणून जनसामान्यांना सत्तेच्या खुर्चीत बसवले, अन्याया विरुद्ध लढण्याची त्यांची शिकवण त्यांच्या विचारांचा मी आजही पाईक असून स्व.बाळासाहेब माझे दैवत आहे, असे प्रतिपादन मा.आमदार विजयराज शिंदे यांनी केले. तसेच भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी संघटनेद्वारे युवकांची मोठी फौज उभी करून इंग्रजां विरुद्ध लढा दिला व ङ्कङ्कतुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुंगाङ्कङ्क हा नारा ज्यांनी बुलंद केला ते नेताजी सुभाषचंद्र बोस आज ही तमाम देशवासियांसाठी आदर्श आहे अश्या भावनाही विजयराज शिंदे यांनी बोलतांना व्यक्त करून त्यांच्या प्रती आदरांजली अर्पण केली. यावेळी अभिवादन करण्यासाठी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे,शहराध्यक्ष मंदार बाहेकर, जिल्हा सचिव मुन्नाजी बेंडवाल, जिल्हा उपाध्यक्ष विलास मानवतकर, जिल्हा सचिव नंदू लवंगे सौ शोभाताई ढवळे, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे,अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड दिगंबर अंभोरे, मोताळा मंडळ अध्यक्ष सचिन शेळके, कामगार आघाडी शहराध्यक्ष शेख रशीद, मोहम्मद अकिल, तालुका उपाध्यक्ष ॲड दशरथसिंग राजपूत,शंकर मलवार, जेष्ठ नेते पुरुषोत्तम लाखोटिया, माजी सैनिक सेल जिल्हा संयोजक सुभेदार अभिमन्यू करपे, प्रदीप सोनटक्के, शहर सरचिटणीस किरण नाईक, प्रा प्रभाकर वारे, पंकज गायकवाड, प्रशांत बोरसे,नितीन दासार, माजी नगरसेवक मुन्ना बेगाणी, वैभव जोशी ई मान्यवर यांनी दोन्ही महापुरुषांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# स्वच्छ शहर फक्त कागदावर! नाल्याच्या कचऱ्याने जळगाव जामोदची कोंडी



**जनसंचलन/ जळगाव जामोद**

शहराच्या मध्यवर्ती भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व पंचायत समिती परिसरालगतचा मुख्य नाला गेल्या अनेक महिन्यांपासून कचऱ्याने पूर्णतः तुंबलेला असून, या घाणेरड्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट ओढावले आहे. नाल्यात साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा अक्षरशः कहर सुरू आहे. मात्र नगर परिषद प्रशासन कुंभकर्णाच्या निद्रेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी आता थेट आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते हिंमत चव्हाण यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद जळगाव जामोद यांना २२ जानेवारी २०२६ रोजी लेखी निवेदन देत तातडीने नाल्याची साफसफाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षभरापासून या नाल्याची एकदाही योग्य स्वच्छता झालेली नाही. परिणामी पाण्याचा निचरा ठप्प झाला असून आजारांचे माहेरघर तयार झाले आहे. नाल्याची तात्काळ स्वच्छता करावी, साचलेला कचरा उचलावा व भविष्यात अशी अवस्था होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण छेडण्याचा थेट इशाराही देण्यात आला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# महिलांनी विवेकी डोळसपणा स्विकारावा -माधवराव हुडेकर

**जनसंचलन/बुलढाणा**




महिलांनी आधुनिकीकरण स्वीकारले पाहिजे. शिक्षणासारखे मोठे माध्यम त्यांना आता खुले झाले आहे. महापुरुषांनी केलेल्या प्रयत्नातून महिलांचे जीवन सुखकर झाले आहे.आधुनिकतेची व ज्ञानार्जनाची कास धरण्या सोबत आपण डोळस,विवेकी झाले पाहिजे असे प्रतिपादन जेस्ट सामाजिक कार्यकर्ते माधवराव हुडेकर यांनी केले. महिला सन्मान आठवड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शिवसाई परिवार व माणस फाउंडेशन च्या वतीने महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. आठवडाभर महिला सक्षमीकरणाचा जागर घातला जात आहे.त्याचाच एक भाग म्हणून २२ जाणे.रोजी सागवान येथे आयोजित कार्यक्रमात हुडेकर यांनी महिलांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हुडेकर होते तर प्रा. डी एस लहाने,प्राचार्य शाहीणा पठाण, ज्योती पाटील, प्रतिभा भुतेकर ,मनीषा वारे आणिता कापरे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना हुडेकर म्हणाले फुले, शाहू, सावित्रीबाईंनी महिलांसाठी महत्त्वपूर्ण काम केले याचे स्मरण आपण ठेवले पाहिजे.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.शिक्षणाची कास आपण धरल्यास आयुष्यामध्ये बदल व्हायला वेळ लागत नाही.अनिष्ट रूढी परंपरा चा सर्वाधिक त्रास महिलांनाच झाला आहे. अनिष्ट रुढीचा त्याग करून आपण कुटुंबात विवेकवाद रुजवावा असे ते म्हणाले .यावेळी प्रा. डी एस लहाने यांनी आयोजनामागची भूमिका मांडली तर शाहिनाताई पठाण यांनी अनुरूप विचार व्यक्त केले. संचालन संदीप जाधव यांनी केले.

# न्याय मिळत नसल्याने गजानन ढोणे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**जनसंचलन/बुलडाणा**

ग्रामपंचायत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आणि वारंवार तक्रारी करूनही न्याय न मिळाल्याने गजानन रामेश्वर ढोणे यांनी लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. संबंधित प्रकरणात अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश असतानाही ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. ढोणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या गावातील गावठाण क्षेत्रात गैरअर्जदारांनी अतिक्रमण केले असून, त्या जागेवर ग्रामपंचायतीने त्यांना निवासासाठी आठ-अ दिले आहेत. मात्र सदर जागेचा वापर निवासासाठी न करता ढोणे यांच्या घराशेजारी गुरे-ढोरे बांधून गोठा उभारण्यात आला आहे. तसेच घरासमोर मोठा उखांडा (कचऱ्याचा ढिगारा) तयार करण्यात आला असून, त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. या परिस्थितीमुळे ढोणे व त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती बुलढाणा यांना चौकशी समिती गठीत करून दोषी कर्मचाऱ्यांविरोधात प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती बुलढाणा यांनीही दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सरपंच व सचिवांना सात दिवसांच्या आत चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. इतकेच नव्हे तर प्राथमिक आरोग्य केंद्र, रायपूर यांनी दिनांक ०६ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायतीला पत्र देत घरासमोरील उखांडा तात्काळ उचलण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर कचऱ्यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी गट विकास अधिकाऱ्यांना या प्रकरणात तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. मात्र या सर्व आदेशांनंतरही तब्बल तीन ते चार महिने उलटून गेले तरी ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांनी कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप गजानन ढोणे यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा १९५९ च्या कलम ३९ (९) नुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच घरासमोरील उखांडा व शेजारील गोठा हटवून या प्रकरणाचा निपटारा दिनांक २२ जानेवारी २०२६ पर्यंत करण्यात यावा, अन्यथा नाईलाजास्तव न्याय मिळवण्यासाठी दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे. उपोषणादरम्यान त्यांच्या जीवास काही बरेवाईट झाल्यास त्यास संपूर्ण प्रशासन जबाबदार राहील, अशी गंभीर नोंद घेण्याची मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, प्रशासन आता तरी वेळेत दखल घेणार का, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

# स्वच्छ शहर फक्त कागदावर! नाल्याच्या कचऱ्याने जळगाव जामोदची कोंडी

जनसंचलन/ जळगाव जामोद

शहराच्या मध्यवर्ती भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व पंचायत समिती परिसरालगतचा मुख्य नाला गेल्या अनेक महिन्यांपासून कचऱ्याने पूर्णतः तुंबलेला असून, या घाणेरड्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट ओढावले आहे. नाल्यात साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा अक्षरशः कहर सुरू आहे. मात्र नगर परिषद प्रशासन कुंभकर्णाच्या निद्रेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी आता थेट आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते हिंमत चव्हाण यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद जळगाव जामोद यांना २२ जानेवारी २०२६ रोजी लेखी निवेदन देत तातडीने




नाल्याची साफसफाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षभरापासून या नाल्याची एकदाही योग्य स्वच्छता झालेली नाही. परिणामी पाण्याचा निचरा ठप्प झाला असून आजारांचे माहेरघर तयार झाले आहे. नाल्याची तात्काळ स्वच्छता करावी, साचलेला कचरा उचलावा व भविष्यात अशी अवस्था होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण छेडण्याचा थेट इशाराही देण्यात आला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा...



जनसंचलन/बुलढाणा

देशभरात २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येतो. परंतु या दिवशी रविवारी सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात हा राष्ट्रीय मतदार दिवस शुक्रवारी (दि.२३) साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाची प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, राजेंद्र पोळ, अनिल गोडगे, डॉ. जयश्री ठाकरे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सांगवी टेकाळे येथे सिकलसेल आजाराबाबत जनजागृती

जनसंचलन/बुलढाणा

आयुष्मान आरोग्य मंदिर, डिग्रस बु. अंतर्गत ग्राम सांगवी टेकाळे येथे दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी अरुणोदयफ्र सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत आरोग्य पथकाने घरोघरी गृहभेटी देऊन सिकलसेल ॲनिमिया आजाराची लवकर ओळख, तपासणीचे महत्त्व तसेच उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत ग्रामस्थांना सविस्तर माहिती दिली. अभियानादरम्यान नागरिकांना तपासणीसाठी प्रोत्साहित करून सिकलसेल आजारासंदर्भातील गैरसमज दूर करण्यावर विशेष भर देण्यात आला. यामुळे ग्रामस्थांमध्ये आजाराविषयी योग्य माहिती पोहोचून आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मदत झाली. यावेळी जिल्हा परिषद शाळा, सांगवी टेकाळे येथील विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेत सहविद्यार्थ्यांना सिकलसेल आजाराबाबत माहिती व समुपदेशन केले.




विद्यार्थ्यांच्या या उपक्रमशील सहभागामुळे जनजागृतीला अधिक बळ मिळाले. कार्यक्रमास समुदाय आरोग्य अधिकारी गजानन शिंगणे, आरोग्यसेविका संगिता पहाड, आरोग्यसेवक अंकुश डोके, आशा स्वयंसेविका झोटे तसेच अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या विशेष अभियानामुळे ग्रामस्थांमध्ये सिकलसेल ॲनिमिया आजाराबाबत जागरूकता वाढली असून, पुढील तपासणी, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांना चालना मिळाली आहे.

# पाटोदा येथे एसटी बसचा कहर! बाहेर निघालेल्या पत्र्यामुळे मोटरसायकलस्वार गंभीर जखमी

जनसंचलन/पाटोदा

राज्य परिवहन महामंडळाच्या निष्काळजीपणाचा आणखी एक बळी पाटोदा येथे समोर आला आहे. आज सकाळी पाटोदा गावात एसटी बस आणि मोटरसायकल यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एक जण जबर जखमी झाला असून, एसटी बसच्या अनफिट अवस्थेमुळेच हा अपघात घडल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे. चिखली आगाराची पेन सावंगीचिखली ही नियमित धावणारी एसटी बस सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास गावातील अरुंद व वळणदार रस्त्यावरून वेगात जात होती. याचवेळी समोरून जाणाऱ्या मोटरसायकलला बसच्या बाजूला बाहेर निघालेल्या सुमारे १२ इंच लोखंडी पत्र्याचा जोरदार धक्का बसला. या धडकेत मागे बसलेले भास्कर विष्णू खंदारे (वय ६५) हे गंभीर जखमी झाले, तर चालक भिकाजी काकफळे (वय ३५) यांना किरकोळ दुखापत झाली.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बस फोर स्पीडमध्ये होती आणि चालकाने कोणतीही खबरदारी घेतलेली नव्हती. गावाचा रस्ता अरुंद असतानाही बेफिकीरपणे बस चालवली जात होती. अपघातानंतर एसटी बस पूर्णतः अनफिट असल्याचे स्पष्ट दिसून आले. अशा धोकादायक अवस्थेतील बसेस रस्त्यावर धावत असल्याने नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. या गंभीर घटनेची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८